# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./ ४६९ /२०१८ दि. २७/०२/२०१८

## परिपत्रक

**विषय - शिक्षक पुरस्कार अर्जाबाबत...**

संदर्भ - प्रा. विशाखा बागडे, सचिव, सर्वोदय आश्रम, नागपुर यांचे पत्र दिनांक ०१/०२/२०१८ नुसार

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, सर्वोदय आश्रम, नागपुरच्या वतीने कै. मामा क्षीरसागर स्मृती आचार्य पुरस्कार आणि कै. दि. ह. उपाख्य बाळासाहेब सहस्त्रबुध्दे स्मृती शिक्षक प्रबोधिनी पुरस्कार २०१७-१८ वितरीत करण्यात येत असून अशा दोन्ही पुरस्कारांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. कै. मामा क्षीरसागर स्मृती आचार्य पुरस्कार, पुज्य विनोबाजी भावे यांच्या आचार्य कुलाच्या विचाराला यथाशक्ती प्रत्यक्ष शिक्षण व्यवहारात व जीवनात रूपान्तरित करून ज्ञाननिष्ठा, समाजनिष्ठा आणि विद्यार्थीनिष्ठा यांचा प्रत्यय घडविणाऱ्या एका शिक्षकास व एका शिक्षिकेस देण्यात येतो. याच त्रिविध निष्ठांशी अभंग बांधिलकी कायम ठेवून सेवानिवृत्तीनंतरही व्यापक समाजाच्या पातळीवर तसेच काम करणाऱ्या शिक्षकास अथवा शिक्षिकेत कै. दि. ह. उपाख्य बाळासाहेब सहस्त्रबुध्दे स्मृती शिक्षक प्रबोधिनी पुरस्काराने गौरविले जात असते. त्याअनुषंगाने संदर्भांकीत पत्रानुसार महाविद्यालयातील शिक्षकांना आपल्यास्तरावर सुचना देण्यात यावी.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र :- उपरोक्तप्रमाणे.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. संचालक, पी. जी. टी. डी. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

F:\BBDD\LATTER\Circular\201

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरूंचे कार्यालय
आवक क्र. 140 दि. 09/02/18
जावक क्र. 403 दि. 12/02/18

# सर्वोदय आश्रम, नागपूर
# SARVODAYA ASHRAM, NAGPUR

(Regd. No. E-173 N-3174)
Amravati Road, Dharampeth,
NAGPUR - 440 010. Ph. 0712 - 2541372

(रजि. नं. इ - १७३ एन - ३१७४)
म. गांधी मार्ग, (अमरावती मार्ग,) धरमपेठ
नागपूर - ४४० ०१०. दूरध्वनी ०७१२ - २५४१३७२

❖ अध्यक्ष ❖
न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी
फोन : ०२२-२२०४४७१६
०७१२-२४३३१२४

❖ सचिव ❖
प्रा. विशाखा बागडे
फोन : ९०९६९०७७९२

❖ कार्यध्यक्ष ❖
श्रीमती लीलाताई चितळे
फोन : ०७१२-२५३२१००

दिनांक : 9/2/2016

प्रति,
मान. प्राचार्य / संस्था प्रमुख
गोंडवाना विद्यापीठ
गडचिरोली (महाराष्ट्र)
सादर नमस्कार,

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 391 दि. 12/02/18
जावक क्र. 1456 दि. 15/2/18

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 631 दि. 15.2.18
जावक क्र. ........ दि. ........

महोदय,

सर्वोदय आश्रम, नागपूर तर्फे आम्ही स्व. मामा क्षीरसागर आचार्यकुल पुरस्कार आणि स्व.दि.ह.सहस्त्रबुद्धे शिक्षक प्रबोधिनी पुरस्कार वितरीत करीत असतो हे आपण जाणताच.

त्या पुरस्काराचें माहितीपत्रक आपल्याकडे पाठवीत आहे. आचार्यकुलाला अभिप्रेत असलेल्या शैक्षणिक कार्याची व मूल्यनिष्ठांची आपल्याला जाणीव आहे. त्या दृष्टिने योग्य अशा व्यक्तीचे नाव, तिच्या माहितीसकट आपण आम्हाला कळविल्यास शिक्षकाची निवड करण्यास आम्हास मदत होईल.

त्या दृष्टीने हे पत्र व पत्रक आपल्याकडे पाठवित आहोत.

सहकार्याच्या अपेक्षेत.

Registrar
circulate
12/02/2018

(प्रा.विशाखा बागडे)
सचिव

सोबत : एक

आस्था

# सर्वोदय आश्रम, नागपूर
# SARVODAYA ASHRAM, NAGPUR

(Regd. No. E-173 N-3174)
Amravati Road, Dharampeth,
NAGPUR - 440 010. Ph. 0712 - 2541372

(रजि. नं. इ - १७३ एन - ३१७४)
म. गांधी मार्ग, (अमरावती मार्ग,) धरमपेठ
नागपूर - ४४० ०१०. दूरध्वनी ०७१२ - २५४१३७२

❖ अध्यक्ष ❖
न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी
फोन : ०२२-२२०४४७१६
०७१२-२४३३१२४

❖ सचिव ❖
प्रा. विशाखा बागडे
फोन : ९०९६९०७७९२

❖ कार्यध्यक्ष ❖
श्रीमती लीलाताई चितळे
फोन : ०७१२-२५३२१००

दिनांक : ९ जाने. २०१८

## शिक्षक पुरस्कारांसाठी अर्ज पाठवावे

सर्वोदय आश्रम, नागपूरच्या वतीने कै. मामा क्षीरसागर स्मृती आचार्य पुरस्कार आणि कै.दि.ह.उपाख्य बाळासाहेब सहस्त्रबुद्धे स्मृती शिक्षक प्रबोधिनी पुरस्कार २०१७–१८ अशा दोन्ही पुरस्कारांसाठी पात्र उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

यापैकी कै.मामा क्षीरसागर स्मृती आचार्य पुरस्कार, पूज्य विनोबाजी भावे यांच्या आचार्य कुलाच्या विचाराला यथाशक्ती प्रत्यक्ष शिक्षण व्यवहारात व जीवनात रूपान्तरित करून ज्ञाननिष्ठा, समाजनिष्ठा आणि विद्यार्थीनिष्ठा यांचा प्रत्यय घडविणाऱ्या एका शिक्षकास व एका शिक्षिकेस देण्यात येतो.

याच त्रिविध निष्ठांशी अभंग बांधिलकी कायम ठेवून सेवानिवृत्तीनंतरही व्यापक समाजाच्या पातळीवर तसेच काम करणाऱ्या शिक्षकास अथवा शिक्षिकेस कै.दि.ह.उपाख्य बाळासाहेब सहस्त्रबुद्धे स्मृती शिक्षक प्रबोधिनी पुरस्काराने गौरविले जात असते.

पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी रू. ५०००.०० (रू. पाच हजार मात्र) रोख, शॉल, श्रीफल व स्मृती चिन्ह असे राहील.

सन २०१७–१८ चे वरील पुरस्कार द्यावयाचे आहेत. त्यासाठी इच्छुकांनी स्वतः अथवा परिचित व्यक्तीमार्फत आपल्या व्यक्तिगत आणि शैक्षणिक कर्तृतवाची पूर्ण माहिती (नाव, पत्ता, दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक इ. सकट) खालील पत्यावर ११ ते ५ कार्यालयीन वेळेत (रविवार व सुटीचे दिवस वगळून) शनिवार दि. १० मार्च २०१८ पर्यंत पोचेल अशा बेताने पाठवावी.

पत्ता : मा. सचिव / संयोजक
शिक्षक पुरस्कार समिती
सर्वोदय आश्रम, बोले पेट्रोलपंपा जवळ, अमरावती मार्ग, धरमपेठ – नागपूर– ४४० ०१०.

(प्रा.विशाखा बागडे)
सचिव